प्रेसनोट

जा.क्र. ६५४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—०७/१०/२०१६

लहान मुलीवर लैगीय अत्याचार करणारे आरोपीस जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा यांचे कडुन ०३ वर्षे कारागृहाची शिक्षा

पोस्टे. भंडारा येथे दिनांक १८/०२/२०११ रोजी ०९ वर्षीय पिडीत मुलगी आपले आईसोबत भंडारा येथे लग्न कार्याकरीता आली आरोपीने सुना मौका पाहुन पिडीत मुलीवर लैगीक अत्याचार केल्याने पो. स्टे. भंडारा कलम ३७६,३५४,५०६ भांदवी गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास सपोनी उराडे पोस्टे भंडारा यांनी पोलीस निरीक्षक भंडारा यांचे मार्गदर्शनाखाली करुन गुन्हयातील आरोपी मोहम्मद सलीम मोहम्मद ईस्माईल वय ५२ वर्ष, रा. छत्तीसगड यास अटक करुन गुन्हयात आरोपीविरुध्द वैद्यकिय परीस्थिती जन्य पुरावा तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षदार गोळा करुन मुदतीचे आत सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ करण्यात आला.

सदर गुन्हा मा. जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा यांचे तपासी अधिकारी बोर्डावर आलेवर कोर्ट पैरवी सहा. किशोर इलमकर बं. नं. ४७५ पो. स्टे भंडारा तसेच तपासी अधिकारी सपोनि. उराडे पोस्टे भंडारा यांनी तपास केला असुन मा. पोलीस अधिक्षक विनीता साहू मॅडम, मा. श्री. संजय जोगदंड, उपविभागीय पोलीस अधिकारी, भंडारा यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक जयवंत चव्हान ठाणेदार भंडारा यांनी सदर गुन्हयाचे घटनाक्रमाबाबत न्यायालयामध्ये योगयरित्या मांडणी केल्याने व आरोपी विरुध्द असलेले पुरावे सिध्द केल्याने मा. जिल्हा न्यायाधिश १ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश श्री. आर. पी. पांडे, जिल्हा सत्र न्यायालय, भंडारा यांनी आरोपी मोहम्मद सलीम मोहम्मद ईस्माईल वय ५२ वर्ष, रा. रायपुर (छ.ग) यास ०३ वर्ष, शिक्षा व ५,०००/—रुपये दंड,दंड न भरल्यास ०२ महीने सजा अशी शिक्षा सुनावलेली आहे.

सदर न्यायनिर्णयामुळे बालकांवर लैगीक अत्याचार करणारे गुन्हेगारांवर वचक निर्माण होण्यास अत्यंत मोलाची मदत होईल सदर खटल्यामध्ये जिल्हा सरकारी वकील म्हणुन ॲड श्री. टवले यांनी कामकाज पाहीले आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.